# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १६५ — दिनांक २१/०६/२०२१

## चैन स्नॅचिंग करणा-या २ गुन्हेगारांना वसई पोलीसांनी केली अटक

दि. २४/०३/२०२१ रोजी रात्री ०९.०० वा. चे सुमारास सौ. अंजु संतोष प्रजापती या त्यांचे नायगाव येथील फिश मार्केट जवळील आईसक्रिमचे दुकानात काउंटरवर असतांना, त्यावेळी अंदाजे २३ ते २५ वर्षाचे दोन अनोळखी इसम स्कुटीवरुन तेथे आले. त्यापैकी एका इसमाने फिर्यादी सौ अंजु प्रजापती यांचेकडे आईसक्रीम घेण्याचा बाहाना करुन दुकानात जावुन फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवले. त्यावेळी फिर्यादी हया बेसावध असतांना व आईसक्रीम देण्यासाठी खाली वाकल्या असता सदरच्या अनोळखी इसमाने त्यांच्या गळयातील सोन्याची चैन हिसकावून घेवून त्याचेसोबत आलेल्या दुस-या इसमासोबत स्कुटीवरुन बसून भरधाव वेगाने पळुन गेले. घडलेल्या घटनेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वसई पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. १४१/२०२१ भा.द.वि. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री. संजयकुमार पाटिल, पोलीस उपायुक्त परि. ०२ यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीकोनातून सुचना दिल्या होत्या. त्यावरुन वसई पोलीस ठाण्याचे स.पो.नि. श्री. सुरवसे व त्यांचे अधिनस्त डी.बी. स्टाफ यांनी पुढील तपास सुरु करुन तपासामध्ये तांत्रिक माहिती प्राप्त करुन व त्याचे कौशल्यपुर्ण विश्लेषण करुन रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे शहानवाज उर्फ फकरुद्दिन शेख वय २५ वर्षे, रा. कोळीवाडा वसई व त्याचा साथीदार सचिन कालीदास वलोदरा वय २३ वर्षे रा. हाती मोहल्ला वसई अशांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न करुन दोन्ही आरोपीतांना शिताफिने ताब्यात घेवुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर गुन्हयात जबरीने चोरी केलेली १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व गुन्हयात वापरलेली ॲक्टिवा स्कुटी असा एकुण ८०,०००/- रुपये किंमतीचा मुदेदमाल जप्त केला आहे. तसेच आरोपीतांनी वसई पोलीस ठाणे हद्दित सुमारे ५ ते ६ महिन्यांपुर्वी ताम तलावाजवळील सार्वजनिक रस्त्यावर एका व्यक्तीशी भांडणाचे कारण करुन त्याचे गळयातील चैन जबरदस्तीने हिसकावुन नेल्याचे तपासादरम्यान सांगितले. सदरबाबत अभिलेख पडताळणी केली असता वसई पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ६२/२०२१ भा.द.वि. कलम ३९२, ३४ अन्वये दि.०१/०२/२०२१ रोजी गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले असून सदर गुन्हयातील चोरीस गेलेली २० ग्रॅम वजनाची एक सोन्याची चैन सदर आरोपीतांकडुन हस्तगत करण्यात आली आहे.

अशाप्रकारे दोन गुन्हयातील चोरीस गेलेल्या एकुण ३५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या चैन व गुन्हयात वापरलेली स्कुटी असा २,२०,०००/-रु चा मुद्देमाल आरोपीतांकडून जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परि-२, श्री. प्रदिप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसई पोलीस ठाणे, पोनि श्री. ऋषिकेश पवळ, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. श्री. राम सुरवसे, सहा.पोउपनि. नितीन नलावडे पो.ना.लांडे, वेजल, पोशि. अमोल बर्डे, संतोष म्हस्के यांनी केली आहे.

-------oooooo-------